पुण्य नगरी

# ‘हिंद-दी-चादर’ कार्यक्रमास सहभागी होण्याचे आवाहन

**धुळे :** गुरु तेगबहाद्दूर यांच्या ३५० व्या शहीद दिनानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विकास विभाग व राज्यस्तरीय समागम समितीच्या वतीने ‘हिंद-दी-चादर’ हा राज्यस्तरीय ऐतिहासिक कार्यक्रम २८ फेब्रुवारी ते १ मार्च या कालावधीत ओवे मैदान, सेक्टर २९, खारघर (नवी मुंबई) येथे होत आहे. या प्रेरणादायी सोहळ्यास धुळेकर नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महापालिकेमार्फत करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार, तसेच अल्पसंख्यांक विभाग राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीची माहिती देण्यात आली आहे. गुरु तेगबहादूर यांच्या त्याग, शौर्य आणि मानवतावादी विचारांचा संदेश बालक, युवक तसेच समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा, या उद्देशाने या कार्यक्रमाचे संयोजन करण्यात आले आहे. सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत चालणाऱ्या या सोहळ्यात महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विभागामार्फत विविध प्रबोधनात्मक उपक्रमही राबवले जाणार आहेत. या ऐतिहासिक व प्रेरणादायी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी व्यापक तयारी सुरू असून, धुळे जिल्ह्यातील नागरिकांनीही या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

Dhule Edition

Feb 10, 2026 Page No. 01

Powered by: erelego.com